दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

**खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी**

**संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक**

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३४० वा ● शुक्रवार, ता. २७ जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००


राजकीय अजेंडा : शिक्षण संचालनालय परिपत्रकावर तीव्र प्रतिक्रिया

## विद्यार्थी संघटनेचा आक्रमक विरोध




**पणजी । प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची विद्यार्थी संघटना (NSUI) गोवा शाखेने शिक्षण संचालनालय (DOE) कडून जारी करण्यात आलेल्या परिपत्रकाचा तीव्र निषेध केला आहे. शाळांमध्ये राजकीयदृष्ट्या संवेदनशील विषयांवर विद्यार्थ्यांना जबरदस्तीने सहभागी करून घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत NSUI ने हे परिपत्रक तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. राजकीय अजेंडा राबविण्याचा प्रयत्न NSUI प्रमुख नौशाद ''शाळा या तटस्थ शैक्षणिक जागा राहिल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांना पक्षपाती कथनांना सामोरे जाण्यास भाग पाडणे त्यांच्या वस्तुनिष्ठ शिक्षणाला अडथळा आणते,'' असे मत NSUI गोवा प्रमुख नौशाद यांनी व्यक्त केले. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की हे परिपत्रक केवळ भाजपचा राजकीय अजेंडा शाळांमध्ये पसरवण्यासाठी आहे. ''हे शालेय मुलांचे नाही, तर RSS शाखेतील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आहे,'' असा गंभीर आरोपही त्यांनी केला. 'लोकशाहीची हत्या' NSUI चा आरोप ''जर सरकारला इतिहासच शिकवायचा असेल, तर महात्मा गांधींच्या हत्येचा, काँग्रेस आमदारांची खरेदी-विक्री, तरुणांच्या नोकऱ्यांची विक्री, मधेईचा घात, जमिनीचे रूपांतर, शिक्षणाची व कला अकादमीची अवहेलना, कायदा-सुव्यवस्थेचा बिघाड, महिला सुरक्षेचा प्रश्न, हे सर्व विषयही अभ्यासात समाविष्ट करावेत,'' अशी मागणी नौशाद यांनी केली. डीओईने मान्य केले चूक अहराज मुल्लाचे NSUI राष्ट्रीय सरचिटणीस अहराज मुल्ला यांनी सांगितले की, ''आज आम्ही DOE अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांनी मान्य केले की संबंधित संस्थांशी कोणतीही सल्लामसलत न करता परिपत्रक जारी करण्यात आले. आम्ही ही अधिसूचना मागे घेण्याची मागणी करत आहोत. अन्यथा मुख्यमंत्री निवासस्थानाबाहेर आंदोलन करू.'' शालेय शिक्षणावर राजकीय सावट नको NSUI नेते NSUI राज्य सरचिटणीस शेन रेबेलो यांनी म्हटले की, ''शालेय विद्यार्थी कोणत्याही राजकीय प्रचारासाठी साधन नाहीत. सरकार शाळांचा वापर आपला राजकीय अजेंडा पुढे नेण्यासाठी करू शकत नाही.'' संविधानावर शिक्षण द्या, प्रचार नको कुमार गौली सरचिटणीस कुमार गौली यांनी स्पष्ट केले की, जर सरकारला संविधानाची काळजी असेल, तर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांवर भर द्यावा. विद्यापीठांचा दर्जा, पायाभूत सुविधा आणि कौशल्यविकास यावर लक्ष केंद्रित करावे. राजकीय अजेंड्यावर वेळ वाया घालवू नये. शाळा म्हणजे वैचारिक रणांगण नाही मैथिली चुंबळकर NSUI कार्यकारिणी सदस्य मैथिली चुंबळकर यांनी म्हटले की, ''शाळांचा परिसर राजकारणासाठी वापरू नये. शाळा या टीकात्मक विचारसरणीचा विकास करणाऱ्या जागा असतात, त्या वैचारिक रणांगण नसाव्यात.'' NSUI गोवा ने स्पष्टपणे म्हटले आहे की जोपर्यंत हे परिपत्रक मागे घेतले जात नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात राजकारण आणण्याच्या प्रयत्नाचा निषेध करत त्यांनी राज्य सरकारवर कडवट टीका केली आहे. अधिक माहितीसाठी गोवाचे नौशाद ९६३७१९४०५३ यांना संपर्क करावा.



## राज्यात मराठी सक्तीची, तृतीय भाषा ऐच्छिक

### शिक्षणमंत्री दादाजी भुसेंचा युटर्न

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा ही बंधनकारक विषय म्हणून शिकवली जाणार असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली आहे. ते म्हणाले की, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यात भाषिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार असून, भविष्यातील 'अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट' मूल्यमापनाच्या संकल्पनेचा विचार करून ही अंमलबजावणी विद्यार्थी हिताच्या दृष्टीने केली जाणार आहे. यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, तृतीय भाषा म्हणून कोणतीही भाषा बंधनकारक राहणार नाही, त्यामुळे हिंदीसह इतर भारतीय भाषा केवळ ऐच्छिक स्वरूपात शिकवता येणार आहेत. मंत्री भुसे पत्रकारांशी बोलत होते. यावेळी शालेय शिक्षण विभागाचे आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार हे देखील उपस्थित होते. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे मराठी भाषेला बळ मिळणार असून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या इतर भाषांचाही पर्याय खुला राहणार आहे.

## भाकप शिष्टमंडळाची इराण दूतावासाला भेट




**मुंबई । प्रतिनिधी**

अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध नोंदवत भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने मुंबईस्थित इराण दूतावासाला भेट दिली. या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने इराणचे राजदूत मोहीसीनी फर्द यांच्याशी सविस्तर चर्चा केली व भारतातील जनतेच्या सहवेदनेचा संदेश दिला. शिष्टमंडळात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे, राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. प्रकाश रेड्डी, इप्टाचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य कॉ. चारुल जोशी, मुंबई महापालिका कामगार युनियन (AITUC) चे प्रतिनिधी कॉ. विजय दळवी, ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनचे कॉ. आमिर काझी तसेच 'हम भारत के लोग' या संघटनेचे फिरोज मिठीबोरवाला सहभागी होते. शिष्टमंडळाने अमेरिकेच्या आक्रमक धोरणांचा निषेध करत जागतिक शांतता आणि सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी भारतातील लोकशाहीवादी आणि प्रगतीशील शक्ती इराणच्या बाजूने असल्याची भूमिका स्पष्ट केली. यावेळी इराण राजदूतांनी भारतातील जनतेच्या पाठिंब्याबद्दल आभार व्यक्त केले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने अमेरिका-इराण संघर्षात अमेरिका चालवत असलेल्या दडपशाही व युद्धजन्य कारवायांचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, या कृतीमुळे जागतिक शांततेस धोका निर्माण होत असल्याचा इशारा दिला आहे.

## राजकीय, आर्थिक शिक्षण

सत्ताधाऱ्यांना खोके, पेट्या देणारे समजा स्वतःच सत्ताधारी बनले? केलाय कधी विचार? कॉर्पोरेट घराणे जवळच्या राज्यकर्त्या पक्षाला/ नेत्याला निवडणूक जिंकण्यासाठी भरघोस मदत करतात. मग त्याची दामदुपटीने वसूली करतात. हे तर उघड गुपित आहे. भारतात अगदी सामान्य नागरिकांना मोदी राजवट आणि अदानी समूहाची झालेली भरभराट यांचा संबंध माहीत आहे. पण उद्या एखाद्या त्या कॉर्पोरेट घराण्याचा मुखिया स्वतः राज्यकर्ता झाला तर काय होईल? कल्पनाशक्तीला ताण द्यायची गरज नाही. डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यानंतर म्हणजे फक्त गेल्या काही महिन्यात काय करत आहेत याचा मागोवा ठेवला तरी पुरे. (कल्पना करा चार महिन्यात एवढे तर चार वर्षात काय काय घडू शकते).

**पहिले प्रकरण -** जानेवारी १९ रोजी ट्रम्प यांनी सत्ताग्रहण केल्याच्या दिवशी ट्रम्प यांच्या कंपनीने नावाचे एक मिम कॉइन, एक प्रकारची क्रिप्टो करन्सी लाँच केली. त्यांच्या नावामुळे तडाखेबाज विक्री झाली. त्याच्या किमतीत काही शे-पट वाढ झाली. त्यांच्या जवळच्या लोकांना प्रचंड नफा मिळवून दिला गेला.



संजीव चांदोरकर

**अर्थवार्ता**


**दुसरे प्रकरण -** २ एप्रिल रोजी ट्रम्प यांनी वाढीव आयात कर जाहीर केले. त्यांना ९ एप्रिल रोजी, ९० दिवसांची स्थगिती दिली. स्थगितीचा निर्णय औपचारिकपणे जाहीर होण्याआधी काही तास त्यांनी त्यांच्या हँडलवर ''ही शेअर्स विकत घेण्याची वेळ आहे'' अशा अर्थाची पोस्ट टाकली. ज्यांना काय होणार हे माहित होते. त्यांनी पटापट शेअर्स विकत घेतले. आयात कर स्थगितीचा निर्णय जाहीर झाल्यावर मार्केट तूफान चढले. आणि ट्रम्पच्या इनसाइडर्सनी तुफान भांडवली नफा कमावला.

**तिसरे प्रकरण -** ट्रम्प मीडिया अँड टेक्नॉलॉजी ग्रुप कॉर्पोरेशन; ही ट्रम्प यांनी स्थापन केलेली कंपनी. त्यात अर्थात त्यांचे कुटुंबीय देखील भागीदार आहेत. याच कंपनीची ट्रूथ सोशल नावाची सोशल मीडिया कंपनी आहे. ती लिस्टेड आहे. ट्रम्प आपले अनेक निर्णय याच कंपनीच्या प्लॅटफॉर्मवर जाहीर करतात. या कंपनीमार्फत ट्रम्प यांचा ब्रँड विकसित केला जात आहे. त्या ब्रँडच्या काही वस्तू विकल्या जात आहेत. उदा. बायबलची छापील प्रत आता या कंपनीची ब्रँडेड वस्तू असेल.

आता तर या कंपनीमार्फत गुंतवणुकीची प्रॉडक्ट विकली जाणार आहेत. नक्की कोणती? तर ट्रम्प राजवटीच्या आर्थिक धोरणांमुळे ज्या क्षेत्रांना प्रोत्साहन मिळू शकते, धंदा मिळू शकतो. उदा. क्रिप्टो करेंसी, ऊर्जा, देशांतर्गत मॅन्युफॅक्चरिंग उद्योग. त्या कंपन्यांचे शेअर्स, एक्सचेंज ट्रेड फंड इत्यादी. सर्व काही खुले आम! सर्वांना सर्व माहिती आहे. हे सर्व तुम्ही देखील गुगल करू शकता. इन्सायडर ट्रेडिंग वगैरे विषय तर चर्चेच्या टेबलावर येत देखील नाही आहेत. यावर अमेरिकन मिडियामध्ये टीका होत आहे. ट्रम्प प्रशासनाची प्रवक्ती सांगते की, ट्रम्प यांच्या मालकीच्या या कंपन्या, ट्रस्ट इत्यादी ट्रम्प यांची मुले सांभाळत आहेत. डोनाल्ड ट्रम्प, म्हणजे राष्ट्राध्यक्ष, स्वतः त्यात लक्ष घालत नाहीत. सिस्टीमचा गेम केला जात आहे. पारदर्शी स्पर्धा, रेग्युलेटर, कंपनी आणि भांडवल बाजार कायदे आणि बरेच काहीअमेरिका या सर्व बाबतीत किती आदर्श आहे हे कॉर्पोरेट वित्त भांडवलशाहीचे प्रवक्ते गेली काही दशके आपल्याला सांगत आहेत. कशासाठी ? भारतासकट सर्व राष्ट्रांनी त्याचे अनुकरण करावे यासाठी. कोठे गेले ते सर्वजण ? लोकशाही आणि राजकीय अर्थव्यवस्थेबद्दलचे धडे गिरवण्यासाठी प्रत्येक घटना आपल्या देशातच घडावी लागते असे काही नाही. इतर देशात काय सुरू आहे यावरून आपल्या देशात काय घडू शकते, याचे अंदाज बांधता येऊ शकतात. याचे आकलन होणे म्हणजे राजकीय आर्थिक शिक्षण!

## तुळजाभवानी मूर्तीच्या अष्टभुज रूपावरून वादंग





**तुळजाभवानी मातेचा 'भारत माता' म्हणून उल्लेख करणे ऐतिहासिकदृष्ट्या अयोग्य. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाशी छेडछाड, सांस्कृतिक राजकारण उघड.**

**पिंपरी । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र तुळजापूर येथे उभारण्यात येत असलेल्या १०८ फूट उंचीच्या तुळजाभवानी मातेसंबंधीच्या शिल्पातील अष्टभुज (आठ हातांची) रूपामुळे नव्या वादाला तोंड फुटले असून, संभाजी ब्रिगेडने या विरुद्ध आक्रमक भूमिका घेतली आहे. या शिल्पात छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देत असल्याचा ऐतिहासिक प्रसंग दाखवण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त करत, मूर्तीचे अष्टभुज रूप मात्र मूळ परंपरेला, इतिहासाला आणि जनश्रद्धेला विरोधात असल्याचा आरोप ब्रिगेडने केला आहे. पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांनी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले. त्यात त्यांनी नमूद केले की, तुळजाभवानी माता मूळ स्वरूपात द्विभुज (दोन हातांची) असून तीच मूर्ती तुळजापूरच्या मंदिरात आहे.

सद्य:स्थितीत प्रसिद्ध करण्यात आलेले संकल्पचित्र देवीच्या मूळ स्वरूपाशी विसंगत असून त्यामुळे भाविकांच्या भावना दुखावल्या जात आहेत. तसेच, या शिल्पाच्या संकल्पनेत तुळजाभवानी मातेचा उल्लेख 'भारत माता' म्हणून करण्यात आल्याचा मुद्दाही संभाजी ब्रिगेडने जोरकसपणे उपस्थित केला आहे. ''भारत माता'' ही संकल्पना आधुनिक राष्ट्रवादाशी संबंधित आहे, तर तुळजाभवानी ही पारंपरिक देवी असून तिचा भारत माता या रूपात उल्लेख होणे ऐतिहासिकदृष्ट्या अयोग्य आणि अप्रामाणिक आहे, असे ब्रिगेडचे म्हणणे आहे. संभाजी ब्रिगेडने पुढील मागण्या केल्या आहेत: शिल्पातील अष्टभुज प्रतिमा त्वरित रद्द करून तुळजाभवानी मातेचे मूळ द्विभुज रूप साकारावे. या प्रकल्पासाठी स्थानिक संस्थान, पुजारी मंडळ, इतिहास अभ्यासक आणि तुळजाभक्तांचा समावेश असलेली अभ्यास समिती त्वरित स्थापन करण्यात यावी. भारत माता असा उल्लेख हटवावा व संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी करून कारवाई करण्यात यावी. या विषयावर त्वरित निर्णय न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा ब्रिगेडने दिला आहे. निवेदनावर पुणे जिल्हाध्यक्ष गणेश दहिभाते, सचिव नकुल भोईर, कार्याध्यक्ष विशाल मिठे, उपाध्यक्ष निरंजन सोखी आणि संघटक गणेश देवराम यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

## बांधकाम कामगारांची फसवणूक करणाऱ्या दलालांवर सरकारचा दंडुका

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील बांधकाम कामगारांची बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करून त्यांच्याकडून आर्थिक फसवणूक करणाऱ्या दलालांवर आता सरकारने कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी या गंभीर प्रकाराची दखल घेत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, राज्यभरात जिल्हास्तरावर दक्षता पथके स्थापन करून विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत.राज्यातील विविध भागांतून लोकप्रतिनिधी व बांधकाम कामगारांकडून नोंदणी, कीट वाटप व इतर योजनांमध्ये गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर १० जुलै २०२५ पर्यंतचा पहिला टप्पा म्हणून विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेद्वारे बनावट कागदपत्रे वापरून कामगार नोंदणी करून फायद्यांचे वाटप करून घेणाऱ्या दलालांना पकडले जाणार असून, दोषींवर कठोर कारवाई केली जाणार आहे. या निर्णयामुळे प्रामाणिक बांधकाम कामगारांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




## 'रंग मल्हार'पावसाळी कला प्रदर्शनाचे २७ जूनला उद्घाटन

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'रंग मल्हार' या विशेष पावसाळी महिला कला प्रदर्शनाचे उद्घाटन ता. २७ जून रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन अकादमीच्या कलादालनात होईल. या प्रदर्शनात विविध महिला कलाकारांनी सादर केलेल्या चित्रांची, कलाकृतींची रंगमंचावर उधळलेली ही 'रंग मल्हार' सरी प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहेत. प्रदर्शन २७ जूनपासून सुरू होऊन १० जुलै २०२५ पर्यंत दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत रसिक प्रेक्षकांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. कला रसिकांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून महिला कलाकारांच्या सर्जनशीलतेला दाद द्यावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



## उद्धव ठाकरे यांनी दिला खंबीर पाठिंब्याचा शब्द

### मातोश्रीवर शेतकरी प्रश्नांवर महत्त्वपूर्ण चर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमुक्ती आणि आत्महत्यांच्या वाढत्या प्रमाणाबाबत राज्यात सकारात्मक पावले उचलण्याच्या दृष्टीने मातोश्री निवासस्थानी एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खा. संजय राऊत, माजी खा. अनिल देसाई, आमदार विनय राऊत तसेच अहमदनगर जिल्ह्याचे शेतकरी नेते भाऊसाहेब वाकचौरे आणि एकलव्य सेनेचे शिवाजी ढवळे उपस्थित होते. या चर्चेप्रसंगी राज्यातील शेतकऱ्यांवरील वाढते आर्थिक ओझे, बँकांकडून होत असलेला तगादा, आणि आत्महत्या या गंभीर विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी शिवसेनेच्या वतीने शेतकरी संघटनांबरोबर खांद्याला खांदा लावून खंबीर साथ देण्याचे स्पष्ट आश्वासन देण्यात आले. या मुद्द्यांवर लवकरच एक विस्तृत बैठक बोलावून धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचे सूचित करण्यात आले आहे. या बैठकीनंतर ॲड. अजित काळे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, राज्यातील शेतकऱ्यांसाठी हा एक दिलासादायक टप्पा असून, त्यांच्या प्रश्नांबाबत शिवसेना गंभीर आहे. लवकरच ठोस निर्णय अपेक्षित आहे. शेतकरी वर्गाच्या समस्या ऐरणीवर आणण्यासाठी अशा बैठकांना महत्त्व असून, शासन आणि संघटनांमधील संवाद हीच शाश्वत समाधानाची गुरुकिल्ली असल्याचे स्पष्ट होत आहे.



## अपघाताची मोठी दुर्घटना टळली; विद्यार्थ्यांचा जीव वाचला

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील गुलमोहररोडवर गुरुवारी दुपारी एक मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. आनंद शाळा सुटण्याच्या वेळी रस्त्यावर उभी असलेली विद्यार्थी मंडळी एका धोकादायक घटनेतून बचावली आहेत. शाळा सुटल्यानंतर मुले शालेय रिक्षा व पालकांची वाट पाहत रस्त्याच्या कडेला उभी होती. एवढ्यात समोरच्या कॉलनीतून आलेल्या एका भरधाव डंपरला रस्त्याच्या कडेला असलेली वीजवाहक तार धक्का लागून ती तुटून थेट रस्त्यावर पडली. सुदैवाने मुले सतर्क होती व त्यांनी वेळेत जागरूकता दाखवत बाजूला पळ काढला. अन्यथा ही तार कोणत्याही विद्यार्थ्याच्या अंगावर किंवा रिक्षावर पडली असती, तर गंभीर अपघात अटळ होता. या संपूर्ण प्रकारानंतर डंपर चालक थांबण्याऐवजी तात्काळ घटनास्थळावरून पसार झाला. सध्या शहरात विविध ठिकाणी सरकारी आणि खासगी विकासकामे सुरू असताना त्यासाठी वापरली जाणारी अवजड वाहने रस्त्यांवरून बेधडकपणे वाहतूक करताना दिसतात. त्यावर आरटीओ व वाहतूक पोलिसांच्या दुर्लक्षामुळे नंबरप्लेटही नसतात. अशा वाहनांच्या हलगर्जीपणामुळे यापूर्वीही अनेक अपघात झालेले असून नागरिकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण आहे. या प्रकारांकडे आरटीओ व वाहतूक पोलिस दुर्लक्ष करत असून, वाहनधारकांवर कुठलाही अंकुश नसल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे हे वाहनचालक नागरिकांच्या जीवाशी खेळत आहेत, की त्यांना यासाठी परवानगीच मिळालेली आहे, असा सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत. स्थानिकांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन संबंधित डंपर चालकाविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने आणि वाहतूक विभागाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.



# १२ वर्षांच्या लढ्याला अखेर यश
# सरोदे आजींचा विजय, शरद पवारांची मदत

**नगर तालुका । प्रतिनिधी**

तालुक्यातील बहुचर्चित चिंचोंडी पाटील येथील ५१ गुंठे जमिनीच्या बेकायदेशीर हस्तांतरण प्रकरणात अप्पर तहसीलदार स्वप्नील ढवळे यांनी कौसाबाई सरोदे यांच्या बाजूने निकाल देत मोठा निर्णय दिला. या निकालामुळे गेल्या नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या शेळी-मेंढी सत्याग्रह आंदोलनाला यश मिळाले. चिंचोंडी पाटील गावातील कौसाबाई मारुती सरोदे यांच्या मालकीच्या गट क्रमांक १०२६ या जमिनीचा १२ वर्षांपूर्वी बेकायदेशीर हस्तांतर झाला होता. तत्कालीन तलाठ्यांच्या मदतीने गावगुंडांनी ही जमीन त्यांच्या नावावर लावली होती. २०२० मध्ये कोरोना काळात सरोदे कुटुंबीय हॉस्पिटलमध्ये दाखल असताना त्यांचे घर पाडण्यात आले, आणि तेव्हा ही बेनामी हस्तांतरणाची बाब उघडकीस आली.

**सरपंच शरद पवार म्हणाले, ''सत्य परेशान हो सकता है पराजित नहीं!'' राजकीय सत्तेपेक्षा सत्य मोठे आहे. नागरिकांच्या हक्कासाठी संघर्ष करण्याची जबाबदारी माझी आहे आणि ती मी निभावली. यापुढे अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून दोषी तलाठी आणि गावगुंडांविरोधात उच्च न्यायालयात गुन्हा दाखल करू, असे त्यांनी स्पष्ट केले.**

या प्रकरणावर आजवर महसूल विभागासमोर तब्बल २५ सुनावण्या झाल्या. परंतु, प्रतिवादी पक्षाकडून कधीच खरेदीखत, साठेखत, गहाणखत वा अन्य अधिकृत कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत. तरीही प्रत्येक वेळेस निकाल लांबवण्यासाठी विविध बहाणे दिले जात होते आणि महसूल अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्यात येत होता. सरपंच शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली सरोदे परिवाराने या अन्यायाविरुद्ध एकापाठोपाठ एक चार आंदोलनं केली. शेवटचं आंदोलन राज्यात अनोख्या पद्धतीने 'शेळी-मेंढी आंदोलन' म्हणून घडून आलं. आंदोलनकर्ते थेट तहसीलदारांच्या दालनात शेळ्या-मेंढ्या घेऊन गेले. त्यामुळे प्रकरण राज्यभर चर्चेत आलं. राजकीय हस्तक्षेपामुळे हे प्रकरण तहसीलदार संजय शिंदे यांनी अप्पर तहसीलदार स्वप्नील ढवळे यांच्याकडे वर्ग केले. सरपंच शरद पवार यांनी यावर आक्रमक आक्षेप घेत आंदोलन तीव्र केले. अखेर १८ जून २०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली. प्रतिवादीकडून खरेदीखत सादर करण्यास वारंवार टाळाटाळ केली गेली. शेवटी अधिकाऱ्यांनी प्रकरण निकालासाठी बंद करून ठेवले. सरपंच शरद पवार यांनी प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात 'सत्याग्रह हल्लाबोल आंदोलन' सुरू केले. याकडे गृहराज्यमंत्री योगेशदादा कदम आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी लक्ष दिले. त्यांनी जिल्हाधिकारी व तहसीलदारांना तातडीने निकाल देण्याचे आदेश दिले. निकाल जाहीर होताच नायब तहसीलदार दळवी यांनी स्वतः सरोदे कुटुंबीय व आंदोलनकर्त्यांना निकालाची प्रत आणि फेरसुधार केलेला ७/१२ उतारा सुपूर्त केला. आंदोलनस्थळी जल्लोष झाला, फटाके वाजवून आणि लाडू वाटून आनंद साजरा करण्यात आला. या लढ्यात गावचे सरपंच शरद पवार यांनी सर्वकाही बारकाईने पाहून न्याय मिळवून दिला. त्यांच्या मदतीला युवानेते पांडुरंग दातीर, अन्याय निवारण समिती अध्यक्ष अरुण रोडे, राष्ट्रवादीचे नेते प्रकाश पोटे, ॲड. सतीश पालवे, टिळक भोस यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.



# धर्मगुरूंना धमकीप्रकरणी ख्रिश्चन समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा
## आ. पडळकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

ख्रिश्चन धर्मगुरूंना जीवे मारण्यासाठी ११ लाख रुपये बक्षीस जाहीर करणाऱ्या आमदार गोपीचंद पडळकर यांच्या चिथावणीखोर आणि द्वेषमूलक वक्तव्याविरोधात ख्रिश्चन समाजाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने ख्रिस्ती धर्मगुरू, प्रतिनिधी संस्था, चर्च सदस्य आणि समाजबांधव उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ''गेल्या काही वर्षांपासून ख्रिस्ती समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात आम्ही शांततेच्या मार्गाने आवाज उठवत आलो आहोत. मात्र, परिस्थितीत कोणताही सकारात्मक बदल होत नाही, उलट धार्मिक द्वेष आणि हिंसेच्या घटना वाढतच आहेत.'' नुकत्याच सागळी (महाराष्ट्र) येथे झालेल्या एका सार्वजनिक कार्यक्रमात आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिस्ती धर्मगुरूंविषयी अत्यंत अपमानास्पद, चिथावणीखोर आणि हिंसक वक्तव्य केले. त्यांनी एका व्यक्तीस ख्रिस्ती धर्मगुरूला जीवे मारल्यास ११ लाख रुपये बक्षीस जाहीर केल्याचे सांगितले. हे वक्तव्य केवळ एका धर्माविरोधात नसून भारतीय संविधानाच्या मूलभूत मूल्यांवर आणि शांततामय सहअस्तित्वावर थेट आघात करणारे आहे. या वक्तव्यामुळे राज्यभरातील ख्रिस्ती धर्मगुरू आणि समाज भयभीत झाले आहेत. त्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून, सामाजिक सलोखा धोक्यात आला आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, धर्मांतराच्या कथित प्रकरणामुळे आत्महत्या झालेल्या पिडीतेप्रती ख्रिस्ती समाजाला सहानुभूती आहे. परंतु त्या घटनेच्या निमित्ताने संपूर्ण ख्रिस्ती समाजाला दोषी ठरवणे आणि टार्गेट करणे हे पूर्णतः अनुचित आहे. अहिल्यानगर येथे झालेल्या धर्मांतरविरोधी जनआक्रोश मोर्चात लावण्यात आलेल्या फलकावर पवित्र क्रॉसच्या प्रतिमेला लाल शाईने फुली मारण्यात आल्याचा निषेधही यावेळी करण्यात आला. हे कृत्य धार्मिक भावना दुखावणारे असून, त्यावरही कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ख्रिश्चन समुदायाने केलेल्या मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे आहेत आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करावा.भारतीय दंड संहिता आणि संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी.त्यांच्या आमदारकीवर तात्काळ रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करावी. धार्मिक भावना दुखावणाऱ्या फलकाच्या आयोजकांवर देखील कारवाई करावी. या आंदोलनात ख्रिस्ती समाजातील अनेक संस्थांचे प्रतिनिधी, चर्चचे धर्मगुरू आणि नागरिक सहभागी झाले होते. त्यांनी शांततेच्या मार्गाने संविधानाच्या संरक्षणासाठी आवाज बुलंद केला.

# ऋणानुबंधतर्फे शनिवारी 'लेकर हम दिवाना दिल' कार्यक्रम

**अहमदनगर । आबीद खान**




शहरातील सामाजिक व सांगीतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या ऋणानुबंध बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने शनिवार, ता. २८ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात ''लेकर हम दिवाना दिल'' या लाईव्ह म्युझिक संध्येचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष कार्यक्रमात सुप्रसिद्ध संगीतकार एस.डी. बर्मन आणि आर.डी. बर्मन यांच्या अजरामर गीतांची लाईव्ह वाद्यवृंदासह मैफल सादर करण्यात येणार आहे.

ऋणानुबंधचे कलाकार 'तेरे मेरे मिलन की ये रैना', 'हम दोनो दो प्रेमी', 'कांची रे कांची रे', 'भीगी भीगी रातों में', 'जय जय शिव शंकर', 'जानू मेरी जान', 'यम्मा यम्मा', 'कोरा कागज था ये मन मेरा' यांसारखी लोकप्रिय गाणी रसिकांसमोर सादर करतील. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या कलाकारांमध्ये अजित रोकडे, डॉ. दमन काशिद, प्रशांत बंडगर, महेश घावटे, डॉ. शैलेंद्र खंडागळे, डॉ. विवेकानंद कंगे, सारंग पंधाडे, अजय आदमाने, भानुदास महानुर, चारुदत्त ससाणे, संजय भिगारदिवे, सारिका रघुवंशी, प्रतिभा साबळे, सीमा रघुवंशी, मोनाली बोरुडे, डॉ. गायत्री कुलकर्णी यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमाचे प्रायोजक शिंगवी ज्वेलर्स, माधवबाग साईमाऊली हॉस्पिटल, डॉ. दमन काशिद हॉस्पिटल, स्नेहदीप हॉस्पिटल, साताळकर लोटस, झेंडे हॉस्पिटल हे आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून माधवबागतर्फे आरोग्य तपासण्या व चाचण्यांवर विशेष सवलतीची कुपने उपस्थित प्रेक्षकांना देण्यात येणार आहेत. तसेच लकी ड्रॉच्या माध्यमातून काही भाग्यवान प्रेक्षकांना पैठणी भेट दिली जाणार आहे. कार्यक्रमाचे प्रवेश पास मिळवण्यासाठी इच्छुकांनी ९४२०६३५०९६ / ९८२३८११११९ / ७३५०८८१५१५ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पंढरपूर 'श्रद्धेच्या रस्त्यावर' २०० किमीची रनवारी

**अहमदनगर। विजय मते**

पारंपरिक वारीच्या भक्तिरसात आधुनिक फिटनेसची सांगड घालणारा आगळावेगळा उपक्रम 'रनवारी २०२५' नुकताच यशस्वीरित्या पार पडला. अहिल्यानगरहून पंढरपूरकडे सुरू झालेल्या या धावत्या वारीने भक्ती, सामाजिक बांधिलकी आणि शारीरिक शिस्त यांचे सुंदर प्रतिक ठरवत २०० किलोमीटरचा अध्यात्मिक प्रवास पूर्ण केला. शनिवार, ता. २१ जून रोजी सकाळी ५ वाजता माळीवाडा येथील श्री विशाल गणपती मंदिरापासून या उपक्रमाला सुरुवात झाली. गणेश आशीर्वाद घेऊन उत्साही धावपटूंनी पंढरपूरच्या दिशेने धाव घेतली. रिले पद्धतीने दोन दिवसांत निवडक १८ धावपटूंनी सुमारे २०० किमीचे अंतर पार करत रविवारी, ता. २२ जून रोजी सकाळी विठ्ठल रुक्मिणी मंदिर, पंढरपूर येथे हा अध्यात्मिक धावपटू वारी प्रवास संपन्न झाला. या धावत्या वारीत सहभागी झालेले



धावपटू: विलास भोजने, गौतम जायभाय, योगेश खरपुडे, ऋतिक पटेल, वैभव वाघ, सूर्यकांत पारधी, नीलम पंडित, स्मिता उकिर्डे, हरीश काबरा, भूषण मालू, शेखर आंधळे, जगदीप मकर, अल्ताफ पठाण, चेतन अग्रवाल, विजय फुलसौंदर, हर्षल अग्रवाल, निलेश संकलेचा, दिलीप पवार आदींचा समावेश होता. या उपक्रमाविषयी मुख्य समन्वयक योगेश खरपुडे म्हणाले, ''रनवारी ही केवळ धावण्याची शर्यत नसून, भक्तीमय ध्येयाने प्रेरित होऊन चालत्या पावलांनी विठ्ठलनामात रंगण्याचा एक अनोखा उपक्रम आहे.'' तर जगदीप मकर यांनी सांगितले की, ''युवकांना पारंपरिक अध्यात्मिक संस्कृतीशी जोडत, त्यांच्यात फिटनेसची जाणीव निर्माण करणे हे 'रनवारी'चे प्रमुख उद्दिष्ट आहे.''या उपक्रमात केवळ 'टीम ' या संघातील निवडक धावपटूंना सहभागी होण्याची संधी देण्यात आली होती. प्रत्येक टप्प्यावर जबाबदारीची भूमिका बजावत, रूट प्लॅनिंग, हायड्रेशन, मेडिकल मदत, जेवण, विश्रांती आणि लॉजिस्टिक याचे नियोजन संघभावनेतून यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. ही रनवारी म्हणजे सामाजिक जाणीवा, अध्यात्म आणि फिटनेस यांचा एकत्रित संगम ठरली आहे. शहरातील विविध स्तरांतून या अभिनव उपक्रमाचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. आगामी वर्षी ही धावती वारी अधिक व्यापक स्वरूपात सर्व धावपटूंना खुली करून साजरी करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. 'रनवारी २०२५' ही एक सुरुवात आहे श्रद्धेच्या रस्त्यावर नवविचारांची धाव!

# सामान्य माणसाची लढाई : पतसंस्थेविरोधात कर्जदारांचे उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरू

**नगर । प्रतिनिधी**

काकणेवाडी (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथील सोमेश्वर पतसंस्थेतील कथित भ्रष्टाचार, बेकायदेशीर वसुली आणि कर्जदारांवरील अन्यायकारक कारवाईच्या विरोधात काकणेवाडी येथील दोन कर्जदारांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा आज तिसरा दिवस असून उपोषणकर्ते निलेश बाळू वाळुंज व नामदेव कारभारी वाळुंज यांची तब्येत खालावली आहे. या उपोषणकर्त्यांनी अनेक गंभीर आरोप केले असून त्यांचे म्हणणे आहे की, पतसंस्थेची बेकायदा वसुली थांबवावी. सहाय्यक



निबंधक व पतसंस्थेचे साटे लोटे आहे.

आमरण उपोषणाचा अर्ज तहसील कार्यालयात १६ दिवसांपूर्वी दिला असतानाही कारवाई न केल्याबद्दल जबाबदार अधिकाऱ्यांना जाब विचारला जावा. आम्ही सामान्य नागरिक आहोत आम्हाला न्याय मिळवा. उपोषणकर्त्यांनी आरोप केला आहे की, ''आम्ही २००६ मध्ये पशुपालन व घरासाठी कर्ज घेतले होते. त्यावेळी आमच्याकडून चार हजार रुपये घेऊन विमा देखील केला गेला. आम्ही हप्ते वेळोवेळी भरलेले असूनही, आमच्या जमिनीवर बेकायदेशीरपणे कब्जा करण्याचा प्रयत्न संस्थेच्या अधिकाऱ्यांकडून केला जात आहे.'' तसेच, ''सोमेश्वर पतसंस्थेच्या विरोधात वेळोवेळी सहाय्यक निबंधक, तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रारी करूनही योग्य तो प्रतिसाद मिळालेला नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी उपनिबंधकांना ई-मेल केला तरी त्यांनी उत्तर देणे टाळले,'' असा आरोप त्यांनी केला. पत्रव्यवहाराची कागदपत्रे आणि पुरावे उपोषणस्थळी उपलब्ध असून त्यातून संस्थेच्या व्यवस्थापनातील गंभीर त्रुटी आणि दुर्लक्ष उघड होत असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. प्रशासन काय भूमिका घेते, आणि या आंदोलनातून संबंधितांना न्याय मिळतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# शाहू महाराजांच्या विचारांचा जागर

## प्रा. सुभाष वारे यांचे व्याख्यान संपन्न



**अहमदनगर । प्रतिनिधी**

लोकराजा राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त सामाजिक न्याय विभाग, सीएसआरडी आणि भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात संविधान अभ्यासक प्रा. सुभाष वारे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी प्रा. वारे म्हणाले, शाहू महाराजांची सामाजिक न्याय विषयक दृष्टी ही सर्व वंचित घटकांना कवेत घेणारी होती. सामाजिक सुधारणांना त्यांनी केवळ शब्दांपुरते मर्यादित न ठेवता, त्यासाठी कायदेशीर पाठबळ दिले. शेतीतील आधुनिकता, स्वतंत्र पाटबंधारे धोरण, सहकार चळवळ, आणि औद्योगिक धोरणाच्या माध्यमातून त्यांनी विकासाचा दूरदृष्टीने विचार मांडला. आज त्यांच्या विचारांची नव्या पिढीने पुनर्विचार करून आचरणात आणण्याची गरज आहे. या कार्यक्रमात सामाजिक न्याय विभागाचे कोकाटे, सीएसआरडीचे संचलक डॉ. सुरेश पठारे, सॅम्युअल वाघमारे, सामाजिक कार्यकर्त्या संध्याताई मेढे, तसेच समाजकल्याण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात शाहू महाराजांच्या समतावादी विचारांवर आधारित परिसंवाद, विद्यार्थ्यांच्या भाषणे आणि सामाजिक परिवर्तनासंदर्भातील चर्चा घडून आली. उपस्थितांनी या कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन सामाजिक न्यायाच्या लढ्याला चालना देण्याची प्रतिज्ञा घेतली.



# राजर्षी शाहू महाराज हे आधुनिक भारतातील सामाजिक न्यायाचे प्रणेते- प्राचार्य रायते


## पर्यावरण जनजागृतीने जयंती साजरी

**राहुरी । प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचालित श्री शाहू विद्यामंदिर, खडांबे (ता. राहुरी) येथे राजर्षी शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिक्षणप्रेमी व समाजसुधारक शाहू महाराजांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शाळेत वक्तृत्व स्पर्धा, रॅली आणि पर्यावरण जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना रोपांचे वाटपही करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या आवारातील शाहू महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यावेळी प्राचार्य मकरंद रायते, पर्यवेक्षक आप्पासाहेब शिंदे, कृषीभूषण सूरसिंगराव पवार, भानुदास कलापुरे, भाऊसाहेब आवारे, प्रभाकर हरिश्चंद्र, राहुल जाधव, संदीप बांगर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात शालेय परिसरातून रॅली काढून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. शिक्षक संजय रोकडे यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांना केशर आंब्याच्या रोपांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम व पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यात आली. प्राचार्य मकरंद रायते यांनी ''राजर्षी शाहू महाराज हे आधुनिक भारतातील सामाजिक न्यायाचे प्रणेते होते. त्यांच्या विचारांची प्रेरणा विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे ही काळाची गरज आहे,'' असे प्रतिपादन केले. शालेय पातळीवर आयोजित वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य, शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि आजच्या काळातील त्यांची विचारसरणी या विषयांवर प्रभावी भाषणे दिली. स्पर्धेतील विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

# कलाबाई लांडे यांचे निधन

**नेवासा । विजय खंडागळे**



तालुक्यातील लांडेवाडी येथील जुन्या पिढीतील व ज्येष्ठ नागरिक कलाबाई बाबुराव लांडे (वय १०४) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने गावातील एक मार्गदर्शक व संयमी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या लांडेवाडीचे माजी सरपंच भास्कर लांडे यांच्या मातोश्री होत. तसेच सोनई येथील शिवसेना शहरप्रमुख राजेंद्र लांडे यांच्या त्या आज्जी होत. कलाबाई लांडे यांच्या अंत्ययात्रेस गावातील तसेच परिसरातील विविध क्षेत्रातील नागरिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून कुटुंब व्यवस्था बळकट करण्यावर भर- साकला

## अन्यायाविरोधात तरुणांनी सजगपणे लढा द्यावा डॉ. पिपाडा यांचे आवाहन

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

भारतीय जैन संघटना व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून राज्यभर जलक्रांतीची चळवळ राबवण्यात आली. या उपक्रमातून ओढे, नाले, तलाव भरले गेले, त्यामुळे शेतकऱ्यांना शेती व पशुपालनासाठी नवसंजीवनी मिळाली. परिणामी गोहत्येचे प्रमाणही बऱ्याच अंशी घटले. लातूरचा भूकंप, पुरपरिस्थिती किंवा कोविडसारख्या आपत्तीतही भारतीय जैन संघटना सतत कार्यरत राहिली.

सामाजिक कार्यात निस्वार्थीपणे काम करणारी ही संघटना आज देशपातळीवर एक महत्त्वाची ओळख बनली आहे. भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार साकला यांनी सांगितले की, ''आजच्या आधुनिक युगात एकत्र कुटुंब व्यवस्था टिकवणे ही काळाची गरज आहे. जेष्ठांचा सल्ला व मार्गदर्शन हा कुटुंबाचा आधार असतो. बीजेएसच्या माध्यमातून कुटुंबव्यवस्थेला बळकटी देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.'' शिर्डी येथे पार पडलेल्या उत्तर अहमदनगर जिल्हा जैन संघटनेच्या मेळाव्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाला संघटनेचे राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा, राज्य प्रमुख केतन शहा, प्रविण पारख, मनसुख चोरडीया, संजय शिंगवी, जिल्हाध्यक्ष आनंद भंडारी, सुमतीलाल गांधी, नरेश सुराणा, कमलेश लोढा, निलेश संकलेचा, अनिल पिपाडा, नेमिचंद लोढा, डॉ. बोरा, संकेत व पियुष सोळंकी, पुखराज पिपाडा, ॲड. बाठीया, स्वप्निल भंडारी, संतोष लोढा, निलेश गंगवाल, आशिष राका, प्राजक्ता भंडारी, संतोष चोरडीया, ललित मुनावत आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. पिपाडा यांचे स्पष्ट मत कार्यक्रमात बोलताना भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी समाजातील तरुणांना उद्देशून सांगितले की, ''अन्याय सहन करणे म्हणजे अहिंसा नव्हे. अन्यायाविरोधात तरुणांनी सजगपणे आणि संघटीतपणे लढा दिला पाहिजे. घरातील ज्येष्ठांनी तरुणांना धाडस शिकवले पाहिजे. समाजाच्या रक्षणासाठी केवळ व्यवसाय नव्हे तर सामाजिक व राजकीय क्षेत्रातही जैन तरुणांनी पुढे यायला हवे.'' ''जैन समाजाचा देशाच्या अर्थव्यवस्थेत सिंहाचा वाटा आहे. दानधर्म, गो-रक्षा, जलसंवर्धन अशा विविध क्षेत्रांत जैन समाजाचे योगदान वाखाणण्याजोगे आहे,'' असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचा उद्देश नवतरुणांमध्ये जनजागृती या मेळाव्याचा मुख्य उद्देश नवतरुण व युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी व नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करणे हाच होता, असे साकला यांनी सांगितले. ''२१व्या शतकातही आपली संस्कृती, परंपरा आणि कुटुंबसंस्था जपली गेली पाहिजे,'' असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.



**कार्यक्रमाप्रसंगी भाजपा नेते डॉ.राजेंद्र पिपाडा समाजातील तरुण युवकांनी अन्यायाच्या विरोधात लढले पाहिजे. घरातील जेष्ठ मंडळींनी तरुणांना धाडसी बनवले पाहिजे. गुंडगिरी व दहशत यांच्या विरोधात तरुणांनी एकत्र येवुन प्रतिकार केला पाहिजे. अहिंसेचा अर्थ अन्याय सहन करणे असा नाही. दडपशाहीला न जुमानता तरुणांनी संघटन वाढवुन पुढे येण्याची गरज आहे. धाडसी समाज असल्याची ओळख निर्माण करणे गरजेचे आहे. फक्त व्यापार व्यवसाय न बघता सामाजिक व राजकीय क्षेत्रात येवुन आपले योगदान देणे गरजेचे आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत जैन समाजाचा सिंहाचा वाटा आहे. दान धर्म असेल किंवा गो-रक्षा असेल अशा प्रत्येक क्षेत्रात जैन समाज आपले योगदान देत असतो.**



# महामानव विचार प्रबोधनतर्फे राजर्षी शाहूंना अभिवादन

## शाहू महाराजांच्या कार्याचा गौरव

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या १५१व्या जयंतीनिमित्त महामानव विचार प्रबोधन समिती व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने श्रीरामपूर येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भारतीय कर्मचारी संघाचे राज्य प्रदेशाध्यक्ष रमेश मकासरे यांनी अभिवादनपर मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात पहिल्यांदाच आरक्षण लागू करून सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीची पायाभरणी केली. त्यांनी बहुजन समाजासाठी सक्तीचे व मोफत शिक्षण सुरू केले. सर्व क्षेत्रांत समान संधी उपलब्ध करून देणारे राज्यकारभार शाहू महाराजांनी यशस्वीपणे चालवला. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शाहू महाराजांची जयंती सणासारखी साजरी करण्याचे आवाहन बहुजन समाजाला केले होते,'' असे ते म्हणाले. कार्यक्रमास बामसेफचे ज्येष्ठ कार्यकर्ते एस. के. चौदंते, दत्तनगरचे माजी सरपंच पी. एस. निकम, लोकवेधचे संचालक अशोक जाधव, विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे तालुकाध्यक्ष सलीम शेख, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष सुगंधराव इंगळे, मुळा-प्रवराचे माजी संचालक अशोक बागुल, तसेच बापू वैराळ, सुधाकर बागुल, तुकाराम धनवडे, सी. एस. बनकर, भारत पगारे, शांताराम बोर्डे, प्रकाश सावंत, एल. एन. म्हस्के, फ्रान्सिस शेळके, भाऊसाहेब हिवराळे, दिनकर मोरे, भाऊसाहेब खरात, अंतोन भरपूरे, के. सी. दाभाडे, लक्ष्मण मोहन, कचरू साबळे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोदावरी नदीवरील अर्धवट पुलाचे काम अखेर सुरू : आंदोलनाला यश

## ३ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर शेडगे यांची माहिती



**श्रीरामपूर । शफीक बागवान**

पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांना जोडणाऱ्या गोदावरी नदीवरील अर्धवट राहिलेल्या पुलाचे काम अखेर सुरू झाले आहे. गेल्या १६ वर्षांपासून रखडलेला हा प्रकल्प स्वतंत्र भारत पक्ष, शेतकरी संघटना व शेतकरी संघटना महिला आघाडी (अहमदनगर) यांच्या जलसमाधी आंदोलनामुळे मार्गी लागला आहे. सराला बेट येथे महंत रामगिरी महाराज व वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे यांच्या हस्ते या पुलाच्या कामाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. या पुलाचे काम २००९ मध्ये सुरू झाले होते, मात्र विविध प्रशासकीय अडथळ्यांमुळे ते अधुरेच राहिले. या कामासाठी दोन जिल्ह्यांतील प्रशासनाचा समन्वय साधणे कठीण होते, मात्र संघटनेच्या आंदोलनामुळे हे शक्य झाल्याचे जिल्हाध्यक्ष निलेश शेडगे यांनी सांगितले. पुलासोबत जोड रस्त्यांचे कामही तत्काळ सुरू करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सुमारे चार महिनेपूर्वी अहमदनगर व नागमठान, पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी गोदावरी नदीत उतरून जलसमाधी आंदोलन केले होते. त्यास मोठे यश मिळाले असून, आज त्या संघर्षाचे फलित दिसून येत आहे. यावेळी महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सुनीता वानखेडे, उपाध्यक्ष नवनाथ दिघे, तालुकाध्यक्ष प्रकाश जाधव, मधु काकड, अशोक आव्हाड, बाळासाहेब घोगरे, रवी वानखेडे तसेच नागमठानचे गणेश तांबे, भानुदास विखे, डॉ. चामे व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जवखेडे खालसा : तांबुळदेव धार्मिकस्थळावर सामूहिक महाआरतीने तणाव

## विवेकशील पोलीस अधिकाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका

**पाथर्डी । प्रतिनिधी**

तालुक्यातील जवखेडे खालसा शिवारातील तांबुळदेव देवस्थान परिसरात सकाळपासून हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांच्या जोरदार शक्तीप्रदर्शनात महाआरती पार पडली. छत्रपती शिवरायांच्या जयघोषात आणि भगवा ध्वज फडकावत कार्यकर्त्यांनी घुमटाच्या आकाराच्या शिखरावर चढून पूजा विधी केले. यात आमदार संग्राम जगताप व मोनिका राजळे यांच्यासह विविध संत-महंत, नाथपंथीय उपासक व हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. या धार्मिक स्थळाला हिंदू बांधव कानिफनाथांचे स्थान, तर मुस्लिम बांधव रमजान दर्गा मानतात. अनेक वर्षांपासून येथे दोन्ही समाजाकडून धार्मिक विधी केले जातात. मात्र, गेल्या आठवड्यात आरतीच्या वादावरून वाद-विवाद व हाणामारी झाली होती. त्यामुळे प्रशासनाने खबरदारी घेत काही हिंदू तरुणांना स्थळावर जाण्यास मज्जाव केला होता. या पार्श्वभूमीवर आज दुपारी पावणे बारा वाजता नियोजनबद्ध सामूहिक आरती पार पडली. कार्यकर्त्यांनी शंख, चिमटे, डमरू वाजवत जयजयकार केला. शिखरावर भगवा ध्वज फडकावण्यात आला. पूर्वीची वस्त्रे फेकून देत नवीन हार व वस्त्र अर्पण करण्यात आले. यावेळी पोलीस बंदोबस्तात संयम राखत उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी आमदार जगताप म्हणाले, हिंदूंना स्वतःच्या देवाची पूजा करण्यास कोणी रोखू शकत नाही. हा हिंदूंचा इतिहास आहे. आम्ही आता गाफील राहायचे नाही. भगव्याचे रूपांतर हिरव्यात करण्यात आले. पोलिसांनी दोन्ही गटांवर समान कारवाई केली, पण ती न्याय्य वाटत नाही. आमदार राजळे म्हणाल्या, सुमारे वीस वर्षांपूर्वी हे देवस्थान हिंदूंच्या ताब्यात होते. दुर्लक्षामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. आता सर्व हिंदूंनी जातपात विसरून एकत्र यावे.यावेळी विवेकशील हस्तक्षेप करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. उपअधीक्षक प्रशांत खैरे, निरीक्षक विलास पुजारी, संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वात विशेष दल, शीघ्र कृती पथक व महिला कर्मचारी तैनात करण्यात आले होते. दरम्यान, प्रशासनाने महाआरतीनंतर घुमटावर लावलेले झेंडे व भगव्या पट्ट्या हटवल्या. जुन्या समझोत्यानुसार गुरूवारी हिंदू व शुक्रवारी मुस्लिम समाजाने पूजाविधी करायचा आहे. उद्या शुक्रवारी मुस्लिम बांधवांकडून काय भूमिका घेतली जाते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. संपूर्ण पश्चिम पाथर्डी तालुक्यात यामुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.



# देशी वृक्षांची लागवड करा

मागील काही वर्षात शहरात सिमेंटच्या जंगलाने गर्दी केली आहे. मोठमोठ्या इमारती आणि टॉवर्स उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. जितक्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली तितक्या प्रमाणात वुक्ष लागवड करण्यात आली नाही. परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडले. त्याचा परिणाम तापमान वाढीवर झाला. तसेच बेसुमार वृक्षतोडीमुळे अनियमित पाऊस, उष्णता अशा संकटांना तोंड द्यावे लागले. यावर मात करण्यासाठी गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्र सरकारने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी या मोहिमेअंतर्गत लाखो वृक्षांची लागवड केली जाते. या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक व सेवाभावी संस्था, तरुण मंडळांनी यात हिरीरीने भाग घेतला. नागरिकांनीही आपल्या घराजवळ, बागेत, शेतात मोकळ्या जागेत, माळरानावर वृक्षारोपण केले. यावर्षीही ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे. या वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करणे आवश्यक असताना ज्या परदेशी वृक्षांची आपल्याला आवश्यकता नाही ; त्यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते. विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हे ही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भुंगे यासारखे कीटक येत नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या फांद्यांचा आणि बुंध्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे, वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखी सरास् दिसणारे पक्षी दिसेनासे झाली आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्षांद्वारे होणाऱ्या बिजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या आस्तित्वशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही निवारा मिळतो. विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेली मुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. विदेशी वृक्ष पुरेसा ऑक्सीजनही देत नाहीत. देशी वृक्ष जितका ऑक्सीजन देतात तितका ऑक्सीजन विदेशी वृक्ष देत नाहीत. काही देशी वृक्ष तर चोवीस तास ऑक्सीजन देतात. वातावरणातील ऑक्सीजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीतजास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी.





**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**



# जिल्हा रुग्णालयात लोकराजा शाहू महाराज यांची १५१ वी जयंती

**सातारा । प्रतिनिधी**

येथील जिल्हा रुग्णालयात लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांची १५१ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सिव्हिल सर्जन डॉ. युवराज करपे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. करपे यांनी सांगितले, लोकराजा शाहू महाराज हे आरक्षण देणारे पहिले राजा होते. त्यांनी समाजातील सर्वस्तरातील नागरिकांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुले केले. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवत नसत, त्यांना एक रुपया दंड ठोठावण्याचा निर्णय घेणारा ते दूरदृष्टी असलेला राजा होता. कला, संस्कृती, क्रीडा आणि शिक्षण या सर्व क्षेत्रांना त्यांनी राजाश्रय दिला. अंधश्रद्धांविरोधात प्रहार करणारा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या घरी जाऊन सन्मान करणारा राजा म्हणजेच शाहू महाराज. कार्यक्रमास अतिरिक्त सिव्हिल सर्जन मेजर डॉ. राहुल देवखाडे, बाह्य संपर्क अधिकारी डॉ. सुभाष कदम, डॉ. अरुंधती कदम, डॉ. मोहोळकर, डॉ. राहुल जाधव, जन्ममृत्यू उपनिबंधक अधिकारी व्यंकटेश गौर, प्रशासकीय अधिकारी डॉ. स्मिता लोंढे, पूजा इंगळे आणि संजय नितनवरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अखेरीस सर्व मान्यवरांनी शाहू महाराजांना त्रिवार अभिवादन केले.

# नगर अर्बन बँक घोटाळा तपासाला गती देण्याचे संकेत

## जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांची तातडीची कार्यवाही




**अहमदनगर । प्रतिनिधी**

२९१ कोटी रूपयांपेक्षा जास्त रकमेच्या घाटाळ्या प्रकरणी गाजत असलेल्या नगर अर्बन बँकेतील आर्थिक गैरव्यवहाराच्या तपासाला आता नवे वळण मिळाले असून, जिल्ह्याचे नवनियुक्त पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्वतः पुढाकार घेत या प्रकरणातील फिर्यादी राजेंद्र गांधी यांची समाधानकारक चौकशी केली आहे. बँक बचाव समितीचे शिलेदार तथा माजी संचालक राजेंद्र गांधी यांनी दिलेल्या माहितीनुसार, नूतन जिल्हा पोलिस अधिक्षक घार्गे यांनी त्यांना समक्ष बोलावून घेतले आणि तपासाच्या प्रगतीबाबत चर्चा केली.



''तपासाबाबत आपण समाधानी आहात का? आणि तपास जलद करण्यासाठी आपल्याला काय अपेक्षा आहेत?'' असा थेट सवाल करून त्यांनी गांभीर्य दाखवले, असे गांधी यांनी सांगितले. याच अनुषंगाने त्यांनी आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांबरोबर विशेष बैठक घेतली. या बैठकीत गांधी यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर टाईमबाउंड कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. राजेंद्र गांधी यांनी या सकारात्मक पावलाचे स्वागत करत, ''हा एक सुखद अनुभव असून तपासाला गती मिळण्याची आम्हाला आशा आहे,'' असे सांगितले.

नगर अर्बन बँक घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही हालचाल मोठ्या महत्त्वाची मानली जात आहे. प्रशासनाच्या या सक्रियतेमुळे पीडित ठेवीदारांमध्येही नव्याने आशा निर्माण झाली आहे.

# ध्वज निधीसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठचे २५ लाखांचे स्नेहयोगदान

**राहुरी । प्रतिनिधी**

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या वतीने जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयासाठी ध्वज निधीसाठी रूपये २५ लाखांचे मोलाचे योगदान देण्यात आले. विद्यापीठाचे कुलसचिव राजेंद्रकुमार पाटील, उपकुलसचिव विजय पाटील आणि नियंत्रक सदाशिव पाटील यांच्या हस्ते जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे यांच्याकडे हा धनादेश औपचारिकरीत्या सुपूर्द करण्यात आला. यावेळी कुलसचिव राजेंद्रकुमार पाटील यांनी सांगितले, राहुरी कृषी विद्यापीठ नेहमीच आपल्या वीर जवानांच्या कुटुंबियांच्या पाठीशी उभे राहिले आहे. या निधीद्वारे त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आणि भविष्यासाठी भक्कम आधार मिळेल.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कोरडे यांनी विद्यापीठाच्या या सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल आभार मानले. त्यांनी नमूद केले की, या निधीद्वारे शहीद आणि माजी सैनिकांच्या पाल्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवता येतो. कार्यक्रमात जिल्हा सैनिक कार्यालयाचे सहा. अधिकारी चंद्रकांत पवार, कल्याण संघटक चंद्रकांत शिंदे यांच्यासह इतर सहकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी केले. ध्वजनिधीचा उपयोग पुढीलप्रमाणे करण्यात येणार : शहरी व ग्रामीण भागातील शहीद जवानांच्या मुलांच्या शिक्षणासाठी. माजी सैनिकांच्या पाल्यांच्या कौशल्यविकासासाठी. शिक्षण व करिअरच्या दृष्टीने आवश्यक मदतीसाठी. ही मदत वीर शहीद कुटुंबांसाठी सशक्त आधार ठरणार असून, त्यांच्या सामाजिक सक्षमीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.




# विधानपरिषद सभापतींच्या दौऱ्यात सुरक्षेतील त्रुटी

## पोलिस अंमलदार निलंबित

**अहमदनगर । प्रतिनिधी**

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अहिल्यानगर दौऱ्यात बंदोबस्त व राजशिष्टाचारात झालेल्या त्रुटींमुळे जिल्हा विशेष शाखेतील पोलिस अंमलदार भगवान रामदास वाघुले यांना निलंबित करण्यात आले आहे. ही कारवाई जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केली. सभापती शिंदे २२ जून रोजी नगर जिल्ह्यात आले होते. त्यांच्या दौऱ्यादरम्यान आवश्यक ते सुरक्षा नियोजन करण्यात आले नव्हते. विशेष म्हणजे, स्थानिक पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारीही या वेळी अनुपस्थित होते. यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने मोठ्या त्रुटी उघड झाल्या. या प्रकाराची गंभीर दखल घेत अंमलदार वाघुले यांच्यावर जबाबदारी निश्चित करत निलंबनाची कारवाई करण्यात आली. यापूर्वी बारामतीतही अशाच प्रकारे सुरक्षाव्यवस्थेत त्रुटी झाल्याच्या प्रकरणात पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. या प्रकारामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुरक्षेच्या बाबतीत अधिक दक्षता घेण्याचे आदेश सर्व पोलिस विभागांना दिले आहेत.

# वावर्ले विद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

**रायगड । सोपान आडसरे**

खालापूर तालुक्यातील वावर्ले येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल या विद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती गुरुवारी ता.२६ जून रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख पवार एस. यू. यांनी केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका चांदणे एम.आर. उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ शिक्षिका नलगे आर. जी. यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली.




यानंतर विज्ञान शिक्षक पाटील व्ही.जी. यांनी ''शाहू महाराजांचे जीवनकार्य आणि सामाजिक न्याय'' या विषयावर मनोगत व्यक्त करताना, त्यांनीच मोफत व सक्तीच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली असल्याचे अधोरेखित केले.

मुख्याध्यापिका चांदणे एम.आर. यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शाहू महाराजांचे शिक्षणाविषयी विचार आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य यावर सखोल प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहाय्यक शिक्षक आडसरे एस.सी. आणि दरेकर वाय.डी. यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शाळेच्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी उपस्थित राहून राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची प्रेरणा घेतली.

## प्रधानमंत्री आवास योजना : ५ एकरमधील ५०४ सदनिकांचा गृहप्रकल्प

# गरजूंना घरांसाठी मनपाकडून सुवर्णसंधी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

गरीब व गरजू नागरीकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना (- २.०) अंतर्गत अहिल्यानगर महापालिकेच्या वतीने नालेगाव येथे ५ एकर क्षेत्रात ५०४ सदनिकांचा गृहप्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाचे आराखडे, सदनिकांचे तपशील, सोयीसुविधा व किंमतीसह संपूर्ण माहिती नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. प्रकल्पाचे एकूण क्षेत्रफळ ५ एकर असून, यामध्ये ५०४ सदनिका उभारल्या जात आहेत. लेआउटमध्ये विस्तृत अंतर्गत रस्ते, उद्याने, सार्वजनिक उपयोगाची जागा, ड्रेनेज व जलवाहिनी व्यवस्था आदी सुविधा नियोजित आहेत. प्रत्येक सदनिकेचा कार्पेट एरिया ३३३ चौ.फुट आणि बिल्टअप एरिया ४१० चौ.फुट (अंदाजे) आहे. सदनिकेत एक शयनकक्ष, हॉल, स्वयंपाकघर, बाथरूम, वॉश एरिया आणि पासेजचा समावेश आहे. संपूर्ण सदनिकेची किंमत: ₹१५,००,०००/-. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत लाभ: ₹२,५०,०००/- सबसिडी. लाभार्थ्याकडून भरावयाची अंतिम किंमत: ₹१२,५०,०००/-. योजनेत सहभागी होणाऱ्या लाभार्थ्याला सुरुवातीला ₹१,००,०००/- भरावे लागतील. उर्वरित ₹११,५०,०००/- रक्कम दोन वर्षांच्या कालावधीत हप्त्यांद्वारे भरणे अपेक्षित आहे. ही योजना मध्यमवर्गीय व गरजू कुटुंबांसाठी विशेषतः उपयुक्त ठरणार आहे. भूकंपरोधक बांधकाम. दर्जेदार टाइल्स, ग्रॅनाईट फिनिशिंग. अंतर्गत जलनिस्सारण व वीजजोडणी. बाहेरील भिंतींना वॉटरप्रूफ पेंट. गेटेड कम्युनिटी, सीसीटीव्ही, स्ट्रीट लाइट्स. हा प्रकल्प मल्हार चौकाजवळ, नालेगाव येथे असून, आहिल्यानगर रेल्वे स्टेशन, स्वस्त बाजार, शासकीय कार्यालये यांना अगदी जवळ आहे. या सोयीमुळे रहिवाशांना दैनंदिन जीवनातील सुविधा सहज उपलब्ध होतील. अहिल्यानगर महापालिकेचा हा गृहप्रकल्प गरजूंना स्वतःचे घर मिळवण्यासाठी एक सुवर्णसंधी आहे. स्वप्नातील घर आता हप्त्यांमध्ये शक्य होणार असून, सबसिडीसह किंमत अधिक सुलभ करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी प्रधानमंत्री आवास योजना विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका, अहमदनगर येथे संपर्क साधावा. नोंदणी आणि अर्ज प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे.

